| X | प्रथम सत्र परीक्षा | S.S.C. |
|---|---|---|
| वेळ : २ तास | विषय : भूगोल | एकूण गुण : ४० |
| S.No. | वर्ग : १० वा | माध्यम : मराठी |

सूचना : १) सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे. २) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
३) प्रश्न क्र. ४ (अ) साठी पुरविण्यात आलेल्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेत जोडावा.
४) प्रश्न क्र. ६ (अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.
५) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.
६) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.
७) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत, पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
८) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.

**प्रश्न १. खालील अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (०४)

१) भारताचे सर्वात दक्षिणेकडील टोक ............ नावाने ओळखले जाते.
i) लक्षद्वीप ii) कन्याकुमारी iii) इंदिरा पॉईंट iv) पोर्ट ब्लेअर

२) ब्राझीलचा सर्वाधिक भूभाग ............
i) उच्चभूमीचा आहे ii) मैदानी आहे
iii) पर्वतीय आहे iv) विखंडित टेकड्यांचा आहे

३) भारताचे हवामान ............ प्रकारचे आहे.
i) दमट ii) मान्सून iii) विषुववृत्तीय iv) शीत

४) साग हा वृक्ष प्रामुख्याने ............ वनात आढळतो.
i) समुद्रकाठ ii) काटेरी iii) पानझडी iv) सूचीपर्णी

**प्रश्न २. 'अ' स्तंभातील घटकाच्या 'ब' स्तंभातील घटकाबरोबर योग्य जोड्या लावा.** (०४)

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ |
|---|---|
| १) सदाहरित वने | अ) पाईन |
| २) समुद्राकाठची वने | ब) खजडी |
| ३) हिमालयीन वने | क) पाव ब्राझील |
| ४) काटेरी व झुडपी वने | ड) सुंद्री |
| | इ) आमर |

https://www.maharashtrastudy.com

प्रश्न ३. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार) (०४)

१) क्षेत्र भेट म्हणजे काय ?

२) भारतात एकूण किती केंद्रशासित प्रदेश आहेत ?

३) ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर कोणते आहे ?

४) ब्राझीलमधील पर्जन्यछायेच्या प्रदेशाला कोणत्या नावाने संबोधतात ?

५) जगातील सर्वात मोठा त्रिभुज प्रदेश कोणता ?

प्रश्न ४. अ) तुम्हाला दिलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा. नावे द्या व सूची तयार करा. (कोणतेही चार) (०४)

१) ब्राझीलमधील क्षेत्रफळाच्या दृष्टीने छोटे/लहान राज्य २) ब्राझीलची राजधानी

३) ॲमेझोनास राज्य ४) पाराना राज्य ५) आमापा राज्य

आ) पुढील नकाशा लक्षपूर्वक अभ्यासा व पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही चार) (०४)






https://www.maharashtrastudy.com

प्रश्न :

१) ४००० मिमीपेक्षा अधिक पर्जन्यमान असलेले भारतातील प्रदेश कोणते ?

२) भारतातील कमाल व किमान तापमानांचे प्रदेश कोणते ?

३) भारतात कोणत्या दिशेने तापमान वाढत जाते ?

४) भारतात वाहणाऱ्या वाऱ्यांची दिशा सांगा. या वाऱ्याचे नाव काय ?

५) भारतातील पर्जन्यासाठी प्रामुख्याने कोणते वारे कारणीभूत आहेत ?

६) भारताच्या उत्तर भागातील हवामान कोणत्या प्रकारात मोडते ?

**प्रश्न ५. भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)** (०६)

१) ब्राझीलमध्ये पश्चिमवाहिनी नद्या आढळत नाहीत.

२) ब्राझील देशातील उच्चभूमीच्या ईशान्य भागात पाऊस अतिशय कमी पडतो.

३) हिमालयाच्या उंच भागात वनस्पतीची संख्या विरळ आढळते.

४) ब्राझीलच्या लोकसंख्येची सरासरी घनता खूप कमी आहे.

**प्रश्न ६. अ) पुढील सारणीत ब्राझीलमधील पर्जन्यमानाचे प्रमाण दिले आहे. ही सांख्यिकीय माहिती वापरून स्तंभालेख तयार करा व पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** https://www.maharashtrastudy.com (०६)

**ब्राझील - वार्षिक सरासरी पर्जन्यमान (मिमीमध्ये)**

| प्राकृतिक विभाग | ॲमेझॉन नदीचे खोरे | पॅराग्वे-पॅराना खोरे | ब्राझील उच्चभूमी | किनारी प्रदेश |
|---|---|---|---|---|
| वार्षिक सरासरी पर्जन्यमान (मिमीमध्ये) | २००० | १५०० | ६०० | १२०० |

प्रश्न : १) ब्राझीलमधील सर्वाधिक वार्षिक सरासरी पर्जन्याचा प्रदेश कोणता ?

२) तुम्ही काढलेल्या आलेखातील 'क्ष' अक्ष काय दर्शवतो ?

३) ब्राझील उच्चभूमीतील पर्जन्याचे वर्णन करा.

किंवा



https://www.maharashtrastudy.com

आ) खालील आलेखाचे वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

वय आणि लिंग मनोरा (भारत २०१६)




प्रश्न : १) वरील आलेखाचे शीर्षक लिहा.

२) सर्वाधिक लोकसंख्या कोणत्या वयोगटात आहे ?

३) 'य' अक्षावर दिलेल्या वयोगटातील वर्गांतर लिहा.

४) ६० पेक्षा जास्त वयोगटातील स्त्री-पुरुष यांपैकी कोणाचे प्रमाण अधिक आहे ?

५) ५५ ते ५९ या वयोगटात स्त्रियांचे प्रमाण किती टक्के आहे ?

६) कोणत्या वयोगटानंतर लोकसंख्येत घट होताना दिसते ?

प्रश्न ७. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (०८)

१) भारत व ब्राझील प्राकृतिक रचनेतील फरक सांगा.

२) दक्षिणेकडून उत्तरेकडे भारतीय हवामानात होणारे बदल थोडक्यात सांगा.

३) ब्राझील व भारतातील वनांचा ऱ्हास होण्याची कारणे कोणती ?

* * * * *



https://www.maharashtrastudy.com